वसई-विरार शहर महानगरपालिका
दि.०८/०५/२०२६

***महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदी श्रीम.बिना मायकल फुट्यार्डो व उप-सभापती पदी श्रीम.सुवर्णा पाटील यांची निवड तर, आरोग्य समितीच्या सभापती पदी श्री.निलेश देशमुख व उप-सभापती पदी श्री.निशाद चोरघे यांची निवड***

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समिती तसेच मा.आरोग्य समितीच्या सभापती व उप-सभापती पदासाठीची निवड करण्यासाठीची विशेष बैठक शुक्रवार दि.०८ मे २०२६ रोजी, दुपारी १२.०० वाजता वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, सर्वसाधारण सभागृह, ४ था मजला, यशवंत नगर, विरार (प.) येथे मा.पीठासीन अधिकारी श्री.मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.नगरसचिव श्री.विश्वनाथ तळेकर तसेच मा.महिला व बालकल्याण समिती व मा.आरोग्य समितीचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदासाठी श्रीम.बिना मायकल फुट्यार्डो व श्रीम.सान्वी संजोग यंदे तसेच मा.महिला व बालकल्याण समिती उप-सभापती पदासाठी श्रीम.मीरा समिर निकम व श्रीम.सुवर्णा अजित पाटील त्याचप्रमाणे मा.आरोग्य समिती सभापती पदासाठी डॉ.योगिता गवळी-करंजकर व श्री.निलेश दामोदर देशमुख तसेच मा.आरोग्य समिती उप-सभापती पदासाठी श्री.जितेश हरीश्चंद्र राऊत व श्री.निशाद अरुणा अरुण चोरघे या समिती सदस्यांनी आपले नामनिर्देशनपत्र सादर केले होते.

सदर निवड प्रक्रियेच्या बैठकीच्या सुरुवातीस मा.पीठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने मा.महिला व बालकल्याण समिती तसेच मा.आरोग्य समितीच्या सभापती व उप-सभापती पदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली. छाननी अंती सादर करण्यात आलेले सर्व नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे जाहीर करीत वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी मा.पीठासीन अधिकारी जाहीर केली. यानंतर वैध नामनिर्देशित उमेदवारांना नामनिर्देशनपत्र मागे घेणे बाबत विहित वेळ देण्यात आला. यावेळेत सादर केलेल्या वैध नामनिर्देशित उमेदवारांपैकी कोणीही आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले नाही. यामुळे मतदान प्रक्रिया घेण्यात आली. उपस्थित सदस्यांनी यावेळी हात वर करून उमेदवारांना आपले मत दिले.

या मतदान प्रक्रियेअंती मा.महिला व बालकल्याण समिती सभापतीच्या उमेदवार श्रीम.बिना मायकल फुट्यार्डो यांना ०९ मते तर श्रीम.सान्वी संजोग यंदे यांना ०५ मते मिळाली. तसेच उप-सभापती पदासाठीच्या उमेदवार श्रीम.सुवर्णा अजित पाटील ०९ मते व श्रीम.मीरा समिर निकम यांना ०५ मते मिळाली. तसेच मा.आरोग्य समिती सभापतीचे उमेदवार श्री.निलेश दामोदर देशमुख यांना ०९ मते तर डॉ.योगिता गवळी-करंजकर यांना ०६ मते मिळाली. तसेच या समितीच्या उप-सभापती पदासाठीचे उमेदवार श्री.निशाद अरुणा अरुण चोरघे यांना ०९ मते तर श्री.जितेश हरीश्चंद्र राऊत यांना ०६ मते मिळाली.

मतदानाचा निकाल जाहीर करीत मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदी श्रीम.बिना मायकल फुट्यार्डो तसेच उप-सभापती पदी श्रीम.सुवर्णा अजित पाटील यांची निवड झाल्याचे त्याचप्रमाणे मा.आरोग्य समिती सभापती पदी श्री.निलेश दामोदर देशमुख व उप-सभापती पदी श्री.निशाद अरुणा अरुण चोरघे यांची निवड झाल्याचे मा.पीठासीन अधिकारी यांचे मार्फत जाहीर करण्यात आले.

तदनंतर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, महानगरपालिकेचे मा.नगरसचिव श्री.विश्वनाथ तळेकर तसेच सर्व सन्माननीय सदस्यांनी मा.महिला व बालकल्याण समिती तसेच मा.आरोग्य समितीच्या सभापती व उप-सभापती निवडीच्या कामकाजात सहकार्य केल्याबद्दल मा.पीठासीन अधिकारी यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून मा.महिला व बालकल्याण समिती व मा.आरोग्य समितीच्या सभापदी व उप-सभापती पदाच्या निवडणुकीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.